
# प्रारंभिक भारत

## प्रागैतिहासिक काळ ते मौर्यकाळ

934
*001-034601*
Acc.No.SR-34601

















डॉ. भूषण फडतरे

Scanned with CamScanner

# अनुक्रम


- मनोगत तीन
- लेखक-परिचय पाच
- प्रकरण १ : प्रारंभिक भारत : साधने आणि प्रागैतिहासिक काळ १
- प्रकरण २ : हडप्पा संस्कृती : कांस्ययुगीन सभ्यता २०
- प्रकरण ३ : वैदिक संस्कृती, धार्मिक विद्रोह : जैन आणि बौद्ध धर्म ३९
- प्रकरण ४ : महाजनपदांचा उदय आणि मौर्यकाळ ७५
- संदर्भसूची ११३


Scanned with CamScanner

प्रकरण १

# प्रारंभिक भारत : साधने आणि प्रागैतिहासिक काळ

## अ) प्रारंभिक इतिहासाचे महत्त्व

प्रारंभिक भारताच्या इतिहासाचा कालखंड हा इ.स.पू. ५ लाख ते १२ वे शतक आहे. या कालखंडालाच प्रारंभी 'भारत वर्ष' असे म्हणत होते. दुष्यंत व शकुंतला यांच्या भरत या पराक्रमी पुत्रावरून 'भरत वर्ष' असे म्हटले आहे. अशा प्राचीन भारताच्या इतिहासाचे महत्त्व अभ्यासताना भौगोलिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या विचार केला पाहिजे.

**१) भौगोलिकदृष्ट्या महत्त्व –** प्राचीन भारतीय भौगोलिकतेच्यादृष्टीने हिमालय व दख्खनचे पठार महत्त्वाचे आहे. अनेक पवित्र धार्मिक स्थळे हिमालयाच्या कुशीत आहेत. याच हिमालयातून अनेक नद्यांचा झालेला उगम हा पुढे मानवी विकासाच्या वाटचालीस महत्त्वाचा ठरला आहे. प्रारंभी सिंधू, सरस्वती व गंगा या नद्यांच्या खोऱ्यात मानवी वसाहती स्थिरावलेल्या होत्या. पुढे बदलत्या काळानुसार मोठी राज्यं, साम्राज्यं निर्माण होत गेली. उत्तरेकडील हिमालयाप्रमाणेच दक्षिणेकडील दख्खनचे पठार हे प्राचीन भारताच्यादृष्टीने महत्त्वाचे होते. दख्खनच्या पठाराचा भूप्रदेश सह्याद्री पर्वत रांगांनी व्यापलेला आहे. सह्याद्री पर्वतातून कृष्णा, गोदावरी, भीमा अशा नद्या वाहतात. या नद्यांच्या सुपीक खोऱ्यांमध्ये उत्तरेप्रमाणे छोट्या वसाहती त्यानंतर टोळ्यांचे राज्य व त्यानंतर साम्राज्यं प्रस्थापित झाली. सांस्कृतिकदृष्ट्या सह्याद्रीचे महत्त्व अधिक आहे. सह्याद्रीचा पर्वत हा काळ्या पाषाणातील एकसंध असल्याने येथे शेकडो लेणी खोदण्यात आली. वेरूळ, अजिंठा, बदामी ही त्यांपैकी काही महत्त्वाची लेणी आहेत. एकंदरीत भौगोलिक वातावरणामध्ये जसजसा बदल होत गेला तसतसा मानवाच्या आचारात, विचारात व त्याच्या कृतीत बदल होत गेला. तो रानटी अवस्थेकडून सुसंस्कृत अवस्थेकडे जाऊ लागला. असे प्राचीन



Scanned with CamScanner

काळातील भौगोलिक महत्त्व मानवाच्या विकासात्मक वाटचालीसाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे.

**२) प्रागैतिहासिक काळाचे महत्त्व** – प्रागैतिहासिक काळात अश्मयुग, मध्याश्मयुग व नवाश्मयुग असे तीन कालखंड पडतात. अश्मयुगात हातकुऱ्हाडीचा आणि दगडी सुऱ्यांचा वापर हत्यार म्हणून झाला. पुढे मध्याश्मयुगात दगडी सुऱ्यांऐवजी दगडाच्या चिपा व त्यापासून बनविलेल्या लहान लहान हत्यारांचा वापर केला; तर नवाश्मयुगात मात्र हत्यारे बनविण्याचे तंत्र अधिक विकसित झाले. दगडी हत्यारे अधिक सफाईदार व गुळगळीत केली. शिवाय, गारगोटीपासून धारदार लहान लहान हत्यारे तयार केली, ताम्रपाषाण युगात तर अशी लहान हत्यारे हाडाच्या खोबणीत, लाकडामध्ये बसविण्याचा प्रकार पुढे आला, असा हा हत्यारांमधील स्थित्यंतराचा टप्पा हा प्राचीन भारतीय इतिहासाच्यादृष्टीने महत्त्वाचा आहे. हत्यारांप्रमाणेच मातीच्या भांड्यातील स्थित्यंतर, शेतीची मशागत करण्यातील स्थित्यंतर हेसुद्धा प्राचीन भारतीय इतिहासाच्यादृष्टीने महत्त्वाचे आहे.

**३) हडप्पा संस्कृतीचे महत्त्व** – प्राचीन काळातील हडप्पा संस्कृतीच्या उदयापूर्वी इजिप्तची नाईल संस्कृती जगातील पहिली संस्कृती म्हणून ओळखली जात होती; पण १९२१मध्ये मात्र भारतात हडप्पा संस्कृतीचा शोध लागला. त्यानंतर अनेक ठिकाणचे उत्खनन झाले. तेथे मिळालेल्या विविध वस्तूंवरून जगातील पहिली संस्कृती ही हडप्पा संस्कृती असल्याचे नव्याने उजेडात आले. पं. नेहरुंनी हडप्पा संस्कृतीला 'भारतीय इतिहासाचे सुवर्णपान' असे म्हटले आहे. अशी ही हडप्पा संस्कृती पहिली असल्याची माहिती प्राचीन भारतीय इतिहासामुळे झाली.

**४) इ.स.पू. ६ वे शतक महत्त्वपूर्ण** – प्राचीन भारताच्या इतिहासात इ.स.पू. ६ वे शतक हे परिवर्तनाचे शतक म्हणून ओळखले जाते. आर्थिक, धार्मिक व राजकीय बदल घडवून आले. आर्थिक बदलाच्यादृष्टीने लोहयुग सुरू झाले. लोखंडी हत्यारांमुळे जंगलतोड झपाट्याने होऊ लागली तर नांगराच्या लोखंडी फाळामुळे अधिक शेती लागवडीखाली येऊ लागली. उत्तरप्रदेश व बिहारच्या परिसरात कौशंबी, श्रावस्ती, अयोध्या, कपिलवस्तू, कुशीनगर, बनारस, वैशाली, पाटीलपुत्र, चंपा ही नगरे भरभराटीस आली. अशा या दुसऱ्या नागरीकरणाबद्दल रोमिला थापर यांनी नमूद केले की, "तंत्रज्ञानाच्यादृष्टीने विचार करता लोखंडाचा वापर, घोडे माणसळवण्याची वाढती प्रक्रिया, नांगरशेती विकास व आधीच्या काळापेक्षा कितीतरी पद्धतशीर बाजार – अर्थव्यवस्था या घटकांवर नवे नागरीकरण आधारलेले होते."



Scanned with CamScanner

याठिकाणी लक्षात घेतले पाहिजे की, 'पहिले नागरीकरण हडप्पा संस्कृतीच्या काळातील आहे.' ही दोन्ही नागरीकरण प्रक्रिया प्राचीन भारतीय इतिहासाच्यादृष्टीने महत्त्वाची आहेत.

लोहयुगात लोकजीवन पूर्णत: स्थिर झाल्यावर उत्तर भारतात प्रादेशिक राज्यं अस्तित्वात आली. तीच सोळा महाजनपदे आहेत. याशिवाय काही गणतंत्र राज्यं होती. या काळातच भारतातील राजकीय जीवनात वंशपरंपरागत राजेशाही प्रथा सुरू झाली. धार्मिक परिवर्तनाच्यादृष्टीने जैन व बौद्ध धर्माचा झालेला उदय हा महत्त्वपूर्ण आहे. वैदिक धर्माच्या तत्त्वज्ञानाला जैन व बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाने धक्का देऊन अहिंसेच्या मार्गाचा पुरस्कार केला.

५) **राजकीय महत्त्व** – प्राचीन भारतीय इतिहासात बलाढ्य अशा राजकीय सत्तेची सुरुवात मगध सत्तेच्या उदयापासून झाली आहे. मगधच्या नंद घराण्यानंतर मौर्य, शुंग, कण्व, गुप्त, वर्धन अशा घराण्यांनी राज्यकारभार केला. प्रत्येक घराण्याची वेगवेगळी वैशिष्ट्ये प्राचीन भारताच्या इतिहासात आढळून येतात. उदा. पहिली प्रभावशाली प्रशासन व्यवस्था असणारे मौर्य घराणे, सुवर्णयुग म्हणून गुप्तांचा कालखंड ओळखला जातो; तर पल्लव व राष्ट्रकूट हे मंदिर स्थापत्य कलेसाठी प्रसिद्ध.

६) **विज्ञानयुगाची ओळख** – विज्ञानयुगाची झालेली ओळख हे एक प्राचीन भारताच्या इतिहासाचे महत्त्व आहे. वैदिक काळातील अथर्ववेदात आयुर्वेदाची माहिती आहे. भारतीय वैद्यक, वनस्पतीशास्त्र व रसायनशास्त्र या तिन्ही शास्त्रांविषयी सुश्रुत व चरक यांनी विस्तृत लेखन केलेले आहे. वैद्यकशास्त्रामध्ये नैसर्गिक औषधोपचार, जडीबुटीची माहिती दिली, तर गुप्त काळात धातूविषयक तंत्रज्ञानात प्रगती झाली होती. कौशल्य व दिल्ली येथील लोहस्तंभ, ब्राँझ व ताम्रधातूचे पुतळे व सुवर्णनाणी ही विज्ञानाची प्रगती होती. दशमानपद्धतीचा व शून्याचा वापर याच काळात केला. गणिती व खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्टने 'पृथ्वी स्वत:भोवती फिरते' हे पहिल्यांदाच सांगितले. खगोलशास्त्रज्ञ वराह मिहिरने 'गोलाकार पृथ्वी अंतरिक्षात अधांतरी फिरत आहे.' या कल्पनेचा पुरस्कार केला. अशा स्वरूपात विविध काळात विज्ञान व तंत्रज्ञानात झालेला विकास हा प्राचीन भारताच्या इतिहासाचे महत्त्व आहे.

७) **स्थापत्य कला** – स्तूप, चैत्य, विहार, स्तंभ व त्यावरील शीर्ष ही मौर्यकालीन स्थापत्याची वैशिष्ट्ये आहेत. मौर्योत्तर काळात मात्र कुषाण व शक या परकीयांनी आक्रमणे केली. त्यामुळे स्थानिक स्थापत्य कलेशी परकीय स्थापत्य कलेचा संबंध आला. या परस्पर प्रभावांमुळे गांधार शैली व मथुरा शैलीचा उगम झाला, प्राचीन अनेक राजांच्या राजाश्रयामुळे लेण्यांची निर्मिती झाली. वेरूळ,



Scanned with CamScanner

अजंठा, नाशिक, कार्ले, भाजे ही त्याची काही उदाहरणे आहेत. लेण्यांमधील शिल्पकाम हे अप्रतिम आहे. वेरूळमधील कैलास मंदिर जगप्रसिद्ध आहे. हे मंदिर राष्ट्रकूट राजा कृष्ण यांच्या काळातील (इ.स.पू. ८ वे शतक) आहे.

### ब) इतिहासाची साधने

प्राचीन ते आधुनिक काळापर्यंतच्या इतिहासाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी किंवा इतिहास समजावून घेण्यासाठी तत्कालीन काळातील साधने महत्त्वाची आहेत. पुरातत्त्वीय, वाङ्मयीन साधनांशिवाय इतिहास नाही; कारण आपण काळाच्या ओघात इतिहासातील घटनांवर पटकन बोलून जातो; पण त्यावर ज्या वेळी वाद-विवाद होतात त्या वेळी आपल्याकडे त्या घटनेच्या संदर्भातील साधने असतील तर आपण आपले मत अधिक प्रभावीपणे मांडू शकतो. यावरून इतिहासामध्ये साधनांना किती महत्त्व आहे हे लक्षात येते. आत्तापर्यंत प्राचीन भारताचा इतिहास जिज्ञासेतून समजावून घेऊन त्यावर योग्य त्या साधनांचा आधार घेऊन प्राचीन इतिहासाचे लेखन केलेले आहे. त्यामध्ये सर विल्यम जोन्स, विल्यम रॉबर्ट्सन, जेम्स प्रिन्सेप, अलेक्झांडर कॅनिंग हॅम या पाश्चिमात्यांबरोबरच काशीप्रसाद जयस्वाल, दामोदर धर्मानंद कोसंबी, शोभना गोखले, आर. एस. शर्मांपर्यंत अनेकांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो.

साधारणपणे प्राचीन भारतीय इतिहासाची साधने तीन प्रकारातील आहेत.

१) पुरातत्त्वीय (भौतिक अवशेष) साधने

२) वाङ्मयीन साधने

३) परकीय प्रवासवर्णने

### १) पुरातत्त्वीय (भौतिक अवशेष) साधने

प्राचीन भारताचा इतिहास जाणून घेण्यासाठी पुरातत्त्वीय साधने उपयुक्त असतात. ती प्राथमिक साधने असून त्यांना इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या साधनांच्या माध्यमातून अतिप्राचीन काळातील इतिहासातील अनेक पैलू उजेडात येतात. अशी पुरातत्त्वीय साधने तीन स्वरूपात उपलब्ध आहेत. अवशेष, आलेख, नाणी यांनाच प्रामुख्याने पुरातत्त्वीय (भौतिक) साधने असे म्हणतात.

**अवशेष** – प्राचीन काळातील ठिकाणांचे झालेले उत्खनन व त्याठिकाणी मिळालेल्या विविध वस्तू, याशिवाय प्राचीन काळातील वस्तूंमध्ये स्तंभ, स्तूप, चैत्य, विहार, लेणी, मंदिर, मूर्ती, वीरगळ इत्यादींच्या अवशेषांवरून प्राचीन भारतीय इतिहासाची माहिती मिळते. अवशेषांमध्ये उत्खननात मिळालेले अवशेष महत्त्वाचे असतात. या अवशेषांचा शोध घेऊन त्यावर शास्त्रशुद्धपणे अभ्यास, संशोधन करण्यासाठी



Scanned with CamScanner

पुरातत्त्वविद्या हे स्वतंत्र शास्त्र आहे; पण ते इतिहासाचे साह्यकारी शास्त्र आहे हेदेखील लक्षात घेतले पाहिजे. इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक व संशोधक डॉ. राजा दीक्षित यांच्या मते, ''पुरातत्त्वविद्या हे शास्त्र म्हणजे गतकाळातील मानवी जीवन आणि वर्तन याविषयीच्या भौतिक अवशेषांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.'' या शास्त्राच्याच आधारे हडप्पा संस्कृतीची ओळख जगाला झाली. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकामध्ये मोहेंजोदारो, हडप्पा येथे प्रथम उत्खनन व त्यानंतर रोपार, चन्हुदारो, बनावली, कालीबंगन, सुरकोटडा, लोथल या उत्खनित ठिकाणी विटा, गृहरचना, धान्य कोठार, सार्वजनिक स्नानगृह, मातीची भांडी, धनुष्य बाण, भाला, शिक्के, काळ्या बांगड्या, अंगठ्या, कंबरपट्टे, शृंगारपेटी, मातीची खेळणी अशा अनेक मिळालेल्या अवशेषांवरून हडप्पा संस्कृती ही विकसित व परिपूर्ण होती हे समजून येते.

**स्तंभ** – प्राचीन भारतीय इतिहासाच्यादृष्टीने स्तंभ व त्यावरील लेख महत्त्वाचे आहेत. मौर्य काळात सम्राट अशोकाने ३५ ते ४० स्तंभ उभारलेले आहेत. शिल्पकला, मूर्तिकला व वास्तुविद्या या तिन्हींचे एकत्रित आविष्कार स्तंभात आहेत. सारनाथ येथील स्तंभ सर्वोत्कृष्ट आहे. गौतमबुद्धाने सारनाथ येथे पहिले प्रवचन (धम्मचक्रप्रवर्तन) दिले असून त्याच ठिकाणी मौर्य सम्राट अशोकाने स्तंभ उभारून आपल्या स्थापत्यकलेची साक्ष जगाला करून दिली. स्तंभावर कमळ, हत्ती, बैल, घोडा, सिंह कोरलेले असून ३२ अरे असलेले चक्र आहेत. सर्वांत वर चार सिंह एकमेकांना चिटकून आहेत. असे हे चार सिंहांचे स्तंभशीर्ष आपल्या देशाचे राष्ट्रचिन्ह तर अशोक चक्र हे राष्ट्रध्वजावर आहे. अशा स्वरूपातील सम्राट अशोकाचे स्तंभ हे प्राचीन भारतीय स्थापत्यकलेची माहिती देणारे महत्त्वपूर्ण साधन आहे.

**स्तूप** – मौर्यकालीन बांधकाम स्थापत्यकलेची माहिती देणारे सर्वोत्कृष्ट साधन म्हणजे सम्राट अशोकाने बांधलेले ८४ हजार स्तूप आहेत. सम्राट अशोकाने गौतमबुद्धांच्या अवशेषांवर अर्धगोलाकार वास्तू उभारली त्यास 'स्तूप' म्हणतात. येथे पूजा केली जात असल्याने स्तूपांना धार्मिक पवित्रता प्राप्त झाली. सांचीचा स्तूप जगप्रसिद्ध असून तो सम्राट अशोकाने बांधला. याशिवाय भरहूत, अमरावती, राजगीर, धौली अशा अनेक स्तूपांमधून बौद्ध धर्माचा प्रसार अशोकाला करता आला यावरून मौर्यकालीन स्थापत्य कला, धार्मिक प्रसाराची माहिती स्तूपांवरून मिळते.

**चैत्यगृह** – प्राचीन काळापासून चैत्यगृह हे स्तूपयुक्त प्रार्थना मंदिर आहे. चैत्याचा आकार दंडगोलाकृती असून त्याच्या मागच्या अर्धवर्तुळाकार भागात दगड स्वरूपातील स्तूपाची निर्मिती केली जाते. मौर्यकाळात बाराबार व नागार्जुनी टेकड्यांवर

सर्व प्रथम चैत्यगृह कोरली. तेथून पुढे सह्याद्रीच्या पर्वतामध्ये लेण्या कोरताना चैत्यगृहाचीही निर्मिती झाली. विशेषत: महाराष्ट्रात सातवाहन काळात कार्ले, भाजे, पितळखोर, अजिंठा, बेडसे, नाशिक, जुन्नर व कान्हेरी येथे चैत्य व विहार आहेत. कार्ले आणि भाजे येथील चैत्यगृह वैशिष्ट्यपूर्ण आहेत. विहार हीसुद्धा बौद्ध भिक्षूंसाठी बांधलेली निवासस्थाने होती. या सर्व वास्तूंवरून सातवाहन कालखंडाची स्थापत्यकलेच्या क्षेत्रातील कामगिरी अत्यंत महत्त्वाची होती हे समजून येते. शिवाय, सातवाहन हे जरी वैदिक धर्माचे पुरस्कर्ते असले तरी त्यांनी बौद्ध धर्माला दिलेला आश्रय चैत्यगृह विहार यांच्या निर्मितीवरून दिसून येतो.

**लेणी** – 'लेणी' हे इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन आहे. भारतात प्राचीन काळात हिंदू, जैन व बौद्ध धर्माच्या लेण्या कोरण्यात आलेल्या आहेत. वेरूळ, अजिंठा, भोकरदान, पितळखोरा, एलिफंटा, जुन्नर, कार्ले, भाजे, बेडसा, नाशिक येथील पाषाणात कोरलेल्या लेण्या या त्या त्या काळातील सांस्कृतिक इतिहासाची माहिती देण्यासाठी मौलिक ठेवा आहेत. राजाच्या आश्रयाने कोरण्यात आलेल्या लेण्यांवरून तत्कालीन काळातील धार्मिक जीवनाची माहिती समजून येते. लेण्या व त्यातील कोरीव शिल्प यावरून कारागिरांची शिल्पकलेविषयी असणारी वैचारिक प्रगल्भता दिसून येते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे वेरूळ लेणीतील घृष्णेश्वर मंदिर होय.

**मंदिर** – भारतीय संस्कृतीमध्ये 'मंदिर' संज्ञेला फार महत्त्व आहे. देशभर नागर व द्राविड स्थापत्यशैलीतील मंदिरांची निर्मिती झाली. त्यामध्ये दक्षिण भारतात तर द्राविड स्थापत्य शैलीचा अधिक प्रभाव पडलेला होता. चालुक्य, पल्लव, राष्ट्रकूट, चोल या सत्तांनी सत्ता विस्ताराबरोबरच मंदिर बांधणीलाही तेवढेच महत्त्व दिले होते. चालुक्यकालीन पापनाथ मंदिर, विरूपाक्ष मंदिर, पल्लवकालीन महाबलीपुरम् येथील सात रथमंदिरे, राष्ट्रकूट कालीन वेरूळ लेण्यातील कैलास (शिव) मंदिर, चोलकालीन तंजावर येथील शिवमंदिर ही सर्व मंदिरे स्थापत्यकलेमुळे प्राचीन भारताच्या इतिहासात लोकप्रिय आहे. या मंदिरांच्या बांधकामावरून ते कोणत्या स्थापत्यशैलीतील आहे हे समजून येते. मंदिर बांधकामासाठी ज्या राजांचा आर्थिक आश्रय मिळाला आहे त्यावरून त्या राजांचा धार्मिक दृष्टिकोन कोणत्या स्वरूपाचा होता याची माहिती मिळते.

मंदिरातील मूर्तीवरून ते मंदिर कोणत्या देव-देवतांचे आहे हे समजून येते. प्राचीन काळात हिंदू-देवतांच्या मूर्ती, गौतमबुद्ध व वर्धमान महावीर यांच्या मूर्ती तयार केलेल्या आहेत. अशा मूर्तीवरून तत्कालीन काळातील इतिहासाची माहिती मिळते.



Scanned with CamScanner

**वीरगळ** – 'वीरगळ' हे प्राचीन भारताच्या इतिहासाचे पुरातत्त्वीय साधन आहे. 'वीरगळ' म्हणजे एखाद्या शूरवीरास कोणत्या कारणास्तव वीरगती प्राप्त झाली आहे त्याचे चित्रण ज्या शिळेवर शिल्प स्वरूपात कोरलेले असतात त्यास 'वीरगळ' असे म्हणतात. प्राचीन काळातील वीरगळावरून लढाईचे स्वरूप, वीराचे महत्त्व व त्या वीराला झालेली मोक्षप्राप्ती यांची माहिती मिळते. वीरगळाप्रमाणे सतीशिळही प्रसिद्ध आहेत. एखादी स्त्री पतीच्या चितेवर सती गेली असेल तर तिच्या स्मरणार्थ सतीशिळा निर्माण केली जाते. म्हणजेच प्राचीन काळात आपल्या परिसरातील एखादा वीर धारातीर्थी पडला असेल तर त्याच्या माहितीचे साधन म्हणजे 'वीरगळ' आहे.

### आलेख

प्राचीन भारताचा इतिहास अभ्यासण्यासाठी आलेखांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. साधारणत: दगडांवर, धातूंवर कोरलेल्या लेखास 'आलेख' असे म्हणतात. आलेखाची सुरुवात सम्राट अशोकाच्या काळापासून झाली. आलेखाचा मुख्य विषय म्हणजे राज्यकर्त्यांचा विजय, त्यांच्या पराक्रमाची गाथा, त्यांच्या आज्ञा, लोकोपयोगी कार्य, धार्मिक देणग्या यांचा मुख्यत: उल्लेख केलेला असतो. आलेख या साधनामध्ये शिलालेख, गुंफालेख, स्तंभालेख, मूर्तीलेख, दानलेख व ताम्रपट इत्यादींचा समावेश होतो.

**i) शिलालेख** – शिलालेख हे प्राचीन भारताच्या इतिहासाचे प्राथमिक साधन आहे. सम्राट अशोकानेच शिलालेख हे डोंगरांवर, गुहांवर, खडकांवर, दगडी स्तंभांवर कोरलेले आहेत. 'देवांना प्रिय प्रियदर्शी राजा असे सांगतो की...' या वाक्याने अशोकाच्या शिलालेखाची सुरुवात होते. सम्राट अशोकाचे चौदा शिलालेख महत्त्वाचे आहेत. ते पुढील ठिकाणी – शहाबाजगढी (पेशावर जिल्हा) येथे – पाच शिलालेख, गिरनार (जुनागढजवळ) – सात शिलालेख, मानसेहरा (हजारा जिल्हा) – एक व कळशी (डेहराडूनजवळ) – एक अशा चौदा शिलालेखांवरून सम्राट अशोकाच्या साम्राज्यविस्ताराची सीमा, पशु, प्राणी व मानव यांच्याविषयी कल्याणकारी धोरण, सर्वधर्म समभावाची दृष्टी या विषयीचे स्पष्ट उल्लेख मिळतात. याशिवाय, कलिंगच्या शिलालेखात सम्राट अशोकाला पश्चात्ताप झाल्याचा तर भाब्रूच्या शिलालेखात बौद्ध धर्माचा अनुयायी झाल्याचा उल्लेख आहे. हे सर्व शिलालेख अशोकाच्या राजकीय कार्याची, सामाजिक व धार्मिक कार्याची माहिती देणारी महत्त्वाची साधने आहेत. याशिवाय, गुप्त घराण्यातील स्कंदगुप्ताच्या लोकोपयोगी कार्याची माहिती गिरनार येथील शिलालेखावरून मिळते; तर पुष्यमित्र शुंगाच्या अयोध्या येथील शिलालेखावरून राजकीय कार्याची माहिती मिळते.



Scanned with CamScanner

ii) **गुंफालेख (गुहालेख)** – 'गुंफा' म्हणजे गुहा होय. तर गुहेलाच लेणी असे म्हणतात. प्राचीन काळातील अनेक राज्यकर्त्यांनी पाषाणात लेण्या कोरलेल्या आहेत. लेण्यातील भिंतींवर, छतांवर, स्तंभांवर, प्रवेशद्वारांवर लेख कोरलेले आहेत. अशा गुहालेखांवरून लेख ज्या राजाने, राणीने कोरलेला आहे त्यांची वंशावळ, साम्राज्यविस्तार, धार्मिक धोरण, लोकोपयोगी कार्य, देणग्या याविषयीचे उल्लेख नमूद केलेले असतात. या संदर्भात सम्राट अशोकाचे बाराबार (गया जिल्हा) येथील तीन गुहालेख प्रसिद्ध आहेत. सातवाहन काळातील गुहालेख हे नाणेघाट, कार्ले, कान्हेरी, नाशिक येथील लेण्यांमध्ये आहेत. जुन्नरजवळील नाणेघाटात सातकर्णी पहिला याची राणी नागनिका हिचा शिलालेख प्रसिद्ध आहे. येथे नागनिकेविषयी बरीच माहिती दिली आहे. गौतमी बलश्री हिच्या नाशिक येथील गुहालेखावरून गौतमी पुत्राच्या विजयाबरोबरच तिने केलेल्या लोकोपयोगी कार्याचीही माहिती दिलेली आहे. तर गुप्त सम्राट चंद्रगुप्त दुसरा याने सौराष्ट्र व काठेवाडच्या प्रदेशात शकांचा पराभव केल्याची माहिती उदयगिरीच्या गुहालेखातून मिळते.

iii) **स्तंभलेख** – स्तंभावर लेख कोरण्याची प्रथा सम्राट अशोकापासून सुरू झाली आहे. अशोकाने पहिला स्तंभलेख दिल्लीतील टोपरा येथे कोरला आहे. त्यानंतर साम्राज्याच्या वेगवेगळ्या भागात ३५ ते ४० स्तंभ उभारले आहेत. दिल्लीशिवाय सारनाथ, अमरावती, तराई येथील स्तंभलेख प्रसिद्ध आहेत. अशा स्तंभांवरून शिल्पकलेची तर माहिती मिळतेच पण स्तंभांवरील लेखांवरून अशोकाच्या बौद्धधर्माविषयीच्या धोरणाबद्दल माहिती मिळते. गुप्त घराण्यातील दिग्विजयी सम्राट समुद्रगुप्त यांच्या अलाहाबाद येथील स्तंभलेखावरून गंगेच्या खोऱ्यातील नऊ राजांचा पराभव करून सत्ता विस्तार केल्याची माहिती मिळते. थोडक्यात, समुद्रगुप्ताच्या साम्राज्य विस्ताराची माहिती मिळण्यास अलाहाबाद येथील स्तंभालेख अत्यंत महत्त्वाचा आहे. याच घराण्यातील स्कंदगुप्ताला सम्राट होतेवेळी हुणांशी कडवी झुंज द्यावी लागली होती. त्याचा उल्लेख स्कंदगुप्ताने काशीजवळील भितरी येथील स्तंभालेखावर केलेला आहे.

iv) **ताम्रपट** – शिलालेख, गुहालेख, स्तंभलेखाप्रमाणेच ताम्रपट हेदेखील प्राचीन भारतीय इतिहासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. प्राचीन काळात राजाकडून कोणत्याही व्यक्तीला, संस्थेला दान देताना त्याची नोंद तांब्याच्या धातूच्या पट्टीवर केली जात असत. अशाच पट्टीला 'ताम्रपट' असे म्हणतात. ताम्रपटात दान देणाऱ्या राजाचे नाव, वंशावळ व दानाचा तपशील आणि दान घेणाऱ्याचे नाव, गाव, कालावधी, रक्कम दिली जात असे. अशा ताम्रपटावरून राजाचा स्वभाव त्याचे



Scanned with CamScanner

धार्मिक धोरण समजून येते. तत्कालीन काळातील सामजिक, आर्थिक व धार्मिक जीवन समजण्यास ताम्रपट हे महत्त्वपूर्ण साधन आहे. चालुक्य राजा कामदेव यांचा राजापूर ताम्रपट, हर्षवर्धनचा बासरखेडा ताम्रपट याशिवाय राष्ट्रकूट राजा अमोघवर्षचा संजन ताम्रपट हे सर्व ताम्रपट महत्त्वाचे आहेत.

**नाणकशास्त्र (नाणी)**

'नाणी' हे प्राचीन भारताच्या इतिहासाचे अत्यंत विश्वसनीय साधन आहे. नाण्यांसाठी सोने, चांदी, शिसे व ब्रॉंझ या धातूंचा वापर केला. धातूवरून राज्याच्या आर्थिक स्थितीची माहिती समजते. तसेच राजा-राणीचे नाव, त्यांची पदवी, आवडनिवड, वेशभूषा, राज्याच्या सीमा, भाषा, लिपी, प्राणी, पक्षी व देव-देवतांची माहिती मिळण्याचे साधन नाणी आहेत. नाण्यांवरील कलाकृतीवरून तत्कालीन सांस्कृतिक इतिहास उजेडात येतो; तसेच मूर्तिशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी नाणी महत्त्वाची असतात. अनेक राजांच्या काळातील नाण्यांवर देव-देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

हडप्पा संस्कृतीपासून ते राष्ट्रकूटपर्यंतच्या राज्यकर्त्यांनी अनेक प्रकारची नाणी पाडली आहेत. हडप्पा संस्कृतीच्या काळात जरी प्रत्यक्षात नाणी नसली तरी धातूचे काही चौकोनी, गोल तुकडे मिळालेले आहेत. त्यांचाच आर्थिक देवाणघेवाणीसाठी त्याचा वापर करीत होते. आहत नाण्यावर मानव आणि प्राण्यांची आकृती, पक्षी, प्राणी, फुले, टेकडी, नदी, सूर्य, चंद्र, अवजारे अशी चिन्हे कोरलेली होती. या चिन्हांवरून राजांची निसर्गाशी जवळीकता असल्याचे दर्शविलेले आहे. सातवाहन नाण्यांवर हत्ती, बैल, सिंह, घोडा, वृक्ष, वेदिका, सूर्य, चंद्र आहेत; तर कुषाण काळातील नाण्यावर शिव, नंदी असल्याने ते शिवभक्त असल्याचे दिसून येते. प्राचीन काळातील सुवर्णयुग म्हणून ओळखलेल्या गुप्त घराण्यातील काही नाणी सोने धातूतील होती. चंद्रगुप्त पहिला याच्या नाण्यावर चंद्रगुप्त व राणी कुमारदेवी हिचे चित्र तर दुसऱ्या बाजूस लिच्छवी अशी अक्षरे आहेत; तर समुद्रगुप्ताच्या नाण्यावर समुद्रगुप्त मांडी घालून बसलेला व वीणा वाजवीत आहे. यावरून या राजाला वीणा वादनाची व संगिताची आवड असली पाहिजे.

**२) वाङ्मयीन साधने**

प्राचीन भारतीय इतिहासाच्यादृष्टीने पुरातत्त्वीय साधनांबरोबरच वाङ्मयीन साधनेही अत्यंत महत्त्वाची आहेत. जे साहित्य लिखित स्वरूपातील आहे त्यास वाङ्मयीन साधने असे म्हणतात. धार्मिक वाङ्मयामध्ये हिंदू, जैन व बौद्ध धर्मातील वाङ्मयाचा समावेश होतो.



Scanned with CamScanner

## २.१ हिंदू वाङ्मय –

हिंदू वाङ्मयातील मुख्य साहित्य म्हणजे वेद-ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, उपनिषदे, वेदांगे, ब्राह्मणे, आरण्यके, महाकाव्य व पुराणे यांचा समावेश आहे.

**अ) ऋग्वेद** – 'ऋग्वेद' हा जगातील सर्वांत प्राचीन ग्रंथ आहे. वैदिक काळातील विस्तृत माहिती देणारा महत्त्वाचा ग्रंथ म्हणून ऋग्वेदाचा उल्लेख केला जातो. ऋग्वेदामध्ये १० मांडले किंवा विभाग असून १०२८ सुक्ते आहेत. एकूण ऋचा १०५५२ आहेत. 'ऋचा' म्हणजे आर्यांच्या वेगवेगळ्या देव-देवतांसाठी रचलेली स्तुतीपर कवने आहेत. या कवनांमधून आर्यांच्या धार्मिक श्रद्धा, त्यांची जीवन पद्धती, संस्कृती, धर्म, ऐतिहासिक घटना यांची माहिती मिळते. यज्ञविधीच्या प्रसंगी 'होत्री' या पुरोहिताकडून ऋचांचे पठण केले जात होते. पूर्व वैदिक काळातील आर्यांची महत्त्वपूर्ण माहिती मिळणारे साधन म्हणजे 'ऋग्वेद' आहे.

**ब) यजुर्वेद** – 'यजुर्वेद' हा यज्ञवेद आहे. यजुर्वेदाचे कृष्ण यजुर्वेद व शुक्ल यजुर्वेद असे दोन भाग पडतात. कृष्ण यजुर्वेदात यज्ञाची जागा, यज्ञकुंड, त्याची लांबी, रुंदी, यज्ञासाठी लागणारे साहित्य यांचे वर्णन आहे तर शुक्ल युजर्वेदात मंत्र, श्लोक आणि यज्ञाच्या प्रसंगी म्हटली जाणारी वाक्यं यांचा समावेश आहे. मंत्र उच्चारणाऱ्या व्यक्तीला अर्ध्वयू असे म्हणतात. आर्यांच्या काळातील भौगोलिक विस्तार, सामाजिक जीवन व धार्मिक जीवनाची माहिती यजुर्वेदातून मिळते.

**क) सामवेद** – सामन् म्हणजे गाणे होय. गाणे या रूपापासूनच सामवेद शब्द तयार झाला. यज्ञाच्या वेळी गावयाच्या ऋचांचा संग्रह सामवेदात आहे. या वेदात १५४९ ऋचा असल्यातरी मूळच्या ७५ ऋचा आहेत. बाकीच्या सर्व ऋग्वेदातील आहेत. गाण्याच्या पद्धतीचा उल्लेख सामवेदात आहे. यज्ञप्रसंगी सामवेदातील ऋचांचे पठण उद्‌गात्री हा पुरोहित करीत होता. प्राचीन काळातील संगिताची माहिती मिळणारे साधन म्हणून सामवेदाचे महत्त्व आहे.

**ड) अथर्ववेद** – अथर्ववेदातील अनेक ऋचा ऋग्वेदांमधून घेतलेल्या आहेत. शत्रूद्वेष, सुखलालसा, जादूटोणा, अंधश्रद्धा याविषयीची माहिती अथर्ववेदातून मिळते. शिवाय औषधी वनस्पतींचा उल्लेख अथर्ववेदात असल्याने प्राचीन काळातील आयुर्वेदाची माहिती मिळते. एकंदरीत अथर्ववेदात वैदिक काळातील समाज जीवन, धार्मिक प्रथा – परंपरा व औषधोपचार इत्यादींची माहिती देताना आर्य व अनार्य यांच्या संघर्षाचीही माहिती याच वेदात दिलेली आहे.

**इ) ब्राह्मणे** – संहिता किंवा वेदांनंतर दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे ब्राह्मण ग्रंथ आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेदाला अनेक ब्राह्मण ग्रंथ आहेत.



Scanned with CamScanner

त्यामुळे ब्राह्मण ग्रंथ हे वेदांची परिशिष्टे आहेत. वैदिक धर्माचे प्राबल्य वाढत गेले. वेदांमधील ऋचा, सुक्ते ही सामान्यलोकांना समजेल अशा पद्धतीने रचना केली तेच 'ब्राह्मण ग्रंथ' आहेत. या ग्रंथांमधून वैदिक धर्माची वास्तविक माहिती समजून देताना राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनाची माहिती मिळते.

**ई) आरण्यके** – ब्राह्मणेनंतर असणारी 'आरण्यके' हेदेखील वेदाचाच भाग आहेत. वानप्रस्थाश्रमात असताना, यज्ञविधीचे पालन करताना तेथे ज्या साहित्याची निर्मिती झाली त्यास 'आरण्यके' असे म्हणतात. वेदातील मूळ तत्त्वज्ञान समजावून सांगणारा ग्रंथ म्हणून आरण्यकांना महत्त्व आहे. त्यामुळेच भारतीय तत्त्वज्ञानाची माहिती देणारी 'आरण्यके ग्रंथ' असल्याचा उल्लेख केला जातो.

**उ) उपनिषदे** – उपनिषद या शब्दाचा मूळ अर्थ म्हणजे 'आपल्या गुरूच्या सान्निध्यात बसून शिक्षण घेणे.' उपनिषदे १०८ आहेत. त्यांपैकी १० उपनिषदे महत्त्वाची आहेत. सर्वच उपनिषदे ही तत्त्वज्ञानाचा गाभा आहेत. त्यावरून वैदिक काळातील तत्त्वज्ञानाची माहिती देण्यास उपनिषदे ही महत्त्वाची आहेत.

## २.२ जैन साहित्य –

वर्धमान महावीरांनी आपला उपदेश अर्धमागधी या लोकभाषेतून दिला. त्यांच्या मृत्यूनंतर मात्र 'अर्धमागधी' आणि 'प्राकृत' या दोन्ही भाषेत जैन साहित्याची निर्मिती झाली. जैन साहित्यात बारा अंग महत्त्वाची आहेत. त्यामध्ये धर्मगुरू व त्यांचे शिष्य यांचे आचार-नियम, त्यांची जीवनपद्धती, प्रवचन व उपदेश, महावीरांचे जीवन कार्य, त्यांची शिकवण व उपासकांचे विधिनियम इत्यादींची माहिती दिलेली आहे. याशिवाय, भद्रबाहू, सिद्धसेन, हरिभद्र, सिद्ध, हेमचंद्र इत्यादींचे जैन साहित्य प्रसिद्ध आहे. भद्रबाहूचा 'कल्पसूत्र' आणि हेमचंद्राचा 'परिशिष्ट पर्व' हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत.

## २.३ बौद्ध साहित्य –

बौद्ध साहित्य 'पाली', या लोकभाषेत लिहिलेले आहे. बौद्ध साहित्यात विनयपिटक, सुत्तपिटक व अभिधम्मपिटक ही त्रिपिटके पाली भाषेतून आहेत. विनयपिटकातून आश्रम वासियांसाठी नियम, सुत्तपिटकातून बुद्धाची शिकवण तर अभिधम्मपिटकातून बौद्ध प्रवचने यांची माहिती मिळते. जातक कथांमधून गौतमबुद्धांच्या पूर्वजन्मीच्या गोष्टींची माहिती मिळते. याशिवाय धम्मपद, सिंहली भाषेतील महावंस व दीपवंस व पाली भाषेतील मिलिंद पन्हो बुद्धचरित, दिव्यवदान या ग्रंथातून बौद्ध धर्माची माहिती मिळते.



Scanned with CamScanner

२.४ समकालीन इतर वाङ्मय -

**१) कौटिल्याचे अर्थशास्त्र** - चंद्रगुप्त मौर्याचा पंतप्रधान कौटिल्य ऊर्फ आर्य चाणक्य यानी 'अर्थशास्त्र' ग्रंथ लिहिला आहे. मौर्य सम्राटांच्या प्रशासन व्यवस्थेची मूळ माहिती देणारा महत्त्वाचा ग्रंथ अर्थशास्त्र आहे. राजा, अमात्य, मित्र, कोष, राष्ट्र, दुर्ग व बल ही कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील सप्तांगे ही पुढे भारतीय राजनीतीमध्ये महत्त्वाची मानली गेली. मौर्यकाळातील शेती, व्यापार, उद्योगधंदे, रूढी, युद्धपद्धती, कायदे, जाती व श्रेणी मंत्रिपरिषदेच्या व नगरसंस्थेच्या कामकाजाचे नियम अशा विविध विषयांची माहिती अर्थशास्त्रामधून मिळते. थोडक्यात, मौर्यकालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनाची माहिती मिळण्यासाठी प्राथमिक साधन म्हणून अर्थशास्त्राचे महत्त्व आहे.

**२) हाल राजाचा गाथा सप्तशती** - सातवाहन राजा हाल याने 'गाथा सप्तशती' या ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथात सातवाहन काळातील सामाजिक व धार्मिक माहिती दिलेली आहे. हाल राजाचा प्रधान गुणाढ्य याने बृहत्कथा कोश हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात सातवाहनकालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय जीवनाची माहिती मिळते. सातवाहनांची राजधानी पैठणचीदेखील माहिती मिळते.

**३) कालिदासाचे साहित्य** - कवी कालिदास हा गुप्त सम्राट चंद्रगुप्ताच्या दरबारातील प्रसिद्ध कवी होता, त्याचे ऋतुसंहार, मेघदूत, मालविकाग्नीमित्र, विक्रमोर्वशीय व अभिज्ञान शाकुंतल इत्यादी नाटके प्रसिद्ध आहेत. या सर्व नाटकांमधून गुप्तकालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. हे साहित्य प्राचीन भारतीय इतिहासाच्यादृष्टीने मौलिक साहित्य आहे.

**४) नीतीसार** - 'नीतीसार' या ग्रंथाची रचना कामंदक यांनी केली आहे. नीतीसार हा भारतीय राज्यव्यवस्थेच्यादृष्टीने महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथात गुप्तकाळातील प्रशासन व परराष्ट्रनीतीचे वर्णन केलेले आहे.

**५) वासवदत्ता** - सुबंधू याने 'वासवदत्ता' या काव्यग्रंथाची रचना केली आहे. गुप्त सम्राट चंद्रगुप्त द्वितीय यांच्या गुप्त साम्राज्यात अशांततेच्या कारभाराचे वर्णन या ग्रंथात दिलेले आहे.

**६) सेतुबंध** - प्रवरसेन महिपती याने 'सेतुबंध' हे महाकाव्य लिहिले. रामाने लंकेला जाऊन केलेल्या रावणाच्या वधाची कथा या महाकाव्यात आहे. तसेच गुप्त व वाकाटक घराण्याचीही माहिती मिळते.

**७) हर्षचरितम्** - सम्राट हर्षवर्धनच्या दरबारातील बाणभट्ट याने 'हर्षचरितम्'



Scanned with CamScanner

हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात हर्षवर्धनचे चरित्र, त्याचा वंश व हर्षकालीन बौद्धधर्माची माहिती दिलेली आहे.

८) **राजतरंगिणी** – कल्हणने 'राजतरंगिणी' ग्रंथ लिहिला असून त्यामध्ये काश्मिरच्या इतिहासाची माहिती दिलेली आहे.

९) **संगम साहित्य** – संगम साहित्य तमीळ भाषेतील आहे. प्राचीन काळातील दक्षिण भारतातील पांड्य, चोल, चेरा या राज्यांच्या इतिहासाचे संगम साहित्य हे महत्त्वपूर्ण साधन आहे. मेळकनक्कू, किळकनक्कू, अकट्टियम्, परिपादल, मदुनाराय, तिरूकुरल, सिलप्पदिकरम् आणि मणिमेखलादू इत्यादी संगम साहित्य आहे.

**३) परकीय प्रवासवर्णने –**

भारतातील पुरातत्त्वीय व वाङ्मयीन साधनांबरोबरच परकीय अनेक भाषांतील विशेषत: प्रवासवर्णने ही महत्त्वाची साधने आहेत. त्यामध्ये पर्शियन, ग्रीक व चीन इत्यादी देशातील अनेक जण भारतामध्ये आलेले होते. त्यांनी आपले अनुभव प्रवास वर्णनाच्या माध्यमातून प्रसिद्ध केले आहेत.

**१) पर्शियन व ग्रीक प्रवासी –**

**अ) भूगोल** – पर्शियाचा सम्राट डेरियसूचा सैनिक स्काईलेक्स हा अलेक्झांडरच्या पूर्वी भारतात आलेला होता. त्याने लिहिलेल्या प्रवास वृत्तांतावरून हडप्पा संस्कृतीची माहिती मिळते. पुढे याच माहितीचा आधार घेऊन हिलेटिअस मिलेटस याने 'भूगोल' नावाचा ग्रंथ लिहिला, या ग्रंथाच्याद्वारे हडप्पा संस्कृतीची माहिती मिळते.

**ब) मेगॅस्थेनिसचा इंडिका** – मेगॅस्थेनिस भारतात पाच वर्षे राहिला असून चंद्रगुप्त मौर्यांच्या दरबारी होता. त्याने भारतात जे जे पाहिले, ऐकले आहे त्यावर आधारित लिहिलेला ग्रंथ हा 'इंडिका' आहे. इंडिका या ग्रंथात सम्राट चंद्रगुप्ताची अप्रतिम लष्कर व्यवस्था, व्यापार, समृद्ध लोकजीवन, मौर्यकालीन शासनव्यवस्था पाटलीपुत्र नगराचे वर्णन इत्यादींची माहिती दिलेली, ही सर्व माहिती मौर्यकालीन विश्वसनीय असल्यानेच इंडिका हा ग्रंथ प्राचीन भारतीय इतिहासाच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे.

**क) टॉलेमी** – टॉलेमी हा इ.स. १३०मध्ये भारतात आला. दक्षिण भारतात फिरला. तो भूगोलाचा तत्त्ववेत्ता असल्याने भौगोलिकदृष्ट्या निरीक्षण करून भूगोल हा ग्रंथ लिहिला, या ग्रंथात सातवाहन राज्य व दक्षिणेकडील काही राज्यांच्या भौगोलिक व ऐतिहासिक परिस्थितीची माहिती दिलेली आहे.

**ड) प्लिनी** – प्लिनीच्या प्रवास वर्णनामध्ये भारतातील वनस्पती, धातू, पशु, प्राणी इत्यादींची माहिती दिलेली आहे.



Scanned with CamScanner

२) चीन प्रवासी –

**अ) फाहियान** – इ. स. ३९९मध्ये भारतात आलेला फाहियान १५ वर्षे येथे राहिला. त्या वेळी भारतात गुप्त सम्राट चंद्रगुप्त दुसरा कार्यरत होता. फाहियानने अनेक ठिकाणांना भेटी दिल्या. त्याने लिहिलेल्या 'फो-को-की' ग्रंथातून चंद्रगुप्त दुसरा या राजाचा पराक्रम व भारतातील सामाजिक, धार्मिक माहिती मिळते.

**ब) ह्यू-एन-त्संग** – सम्राट हर्षवर्धनच्या काळात ह्यू-एन-त्संग भारतात आला, त्याने येथील अनेक ठिकाणांना भेटी दिल्या. त्याने 'सि-या-की' ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथातून हर्षवर्धनकालीन शासनव्यवस्था, राजनीती, धार्मिक जीवन व हर्षवर्धनच्या जीवन चरित्राची माहिती मिळते.

**क) इत्सिंग** – सातव्या शतकाच्या शेवटी इत्सिंग भारतात आला. नालंदा व विक्रमशिला विद्यापीठात अनेक वर्षे राहिला. त्यामुळे त्याच्या प्रवास वर्णनावरून प्राचीन काळातील शिक्षण विषयक पद्धतीची माहिती मिळते.

## क) पुरापाषाण युग, मध्यपाषाण युग आणि ताम्रपाषाणयुगीन संस्कृती : संक्षिप्त आढावा

अतिप्राचीन काळात मानवाची वाटचाल व त्याच्या हालचालीतून निर्माण झालेले वसाहतीक स्वरूप हे स्थित्यंतर रानटी अवस्थेकडून सुसंस्कृत अवस्थेकडे जाणारे होते. ज्या काळात लेखनकला अवगत नव्हती त्या काळाला 'इतिहासपूर्व काळ' किंवा 'प्रागैतिहासिक काळ' असे म्हणतात. या काळाचे पाषाणयुग (अश्मयुग – त्यामध्ये पूर्वपुराणाश्मयुग, मध्यपुराणाश्मयुग, उत्तरपुराणाश्मयुग), मध्याश्मयुग व नवाश्मयुग असे तीन टप्पे पडतात. या टप्प्यांनंतर मानवाने केलेल्या प्रगतीतून धातूयुग आले. त्यामध्ये तांबे या धातूचा सर्वांत प्रथम वापर केल्याने या युगाला 'ताम्रपाषाणयुग' असे म्हणतात.

भारतामध्ये अनेक ठिकाणी झालेल्या उत्खननात ओबडधोबड दगडी हत्यारे, मानवाचे सांगाडे, दागिने, मातीची भांडी, कुंभाराचे चाक, दगडी परशु अशा अनेक वस्तू मिळालेल्या आहेत. या वस्तूंचा कालखंड ओळखण्यासाठी तौलनिक कालमापन, कार्बन १४ कालमापन, पराग पृथक्करण, वृक्ष वलय कालमापन व वसाहत कालनमापन पद्धतीचा वापर केला जातो.

### १) पाषाणयुग (अश्मयुग) –

पाषाणयुगालाच 'अश्मयुग' म्हणतात. हत्यारातील बदलते स्वरूप व हवामानातील बदल यावरून पाषाणयुगाचे पूर्वपुराणाश्मयुग, मध्यपुराणाश्मयुग आणि उत्तरपुराणाश्मयुग असे तीन टप्पे पडतात.



Scanned with CamScanner

### पहिला टप्पा - पूर्वपुराणाश्मयुग

पूर्वपुराणाश्मयुगातील मानव गुहेत राहात होता. त्याला शेतीचे ज्ञान अवगत नसल्याने अन्न म्हणून तो प्राण्यांचे मांस, कंदमुळे व फळे यांचा उपयोग करीत होता. त्यासाठी त्याला सतत भटकंती करावी लागत होती. शिकारीसाठी ओबडधोबड दगडांचा वापर करीत होता; पण या दगडाच्या आजूबाजूचे छिलके काढून दगडाच्या मध्यभागातील टणक अशा भागाचा वापर हत्यार म्हणून करीत होता. असे दगड तयार करण्याची कला मात्र मानवाने अवगत केली होती. याशिवाय प्राण्यांच्या दातांपासूनच्या माळा, शिंपल्याच्या माळा व चित्रकला अशा विविध कला मानवाने अवगत केल्याने तो स्थिर संस्कृतीच्या दिशेने वाटचाल करू लागला. अशा पूर्वपुराणाश्मयुगाचे अवशेष उत्तरप्रदेशमधील मिर्झापूर जिल्ह्यातील बेलान खोरे, कर्नाटकातील जलप्रभा खोरे, महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील तापीचे खोरे, नाशिक जिल्ह्यातील गोदावरी खोरे, अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरेचे खोरे व चंद्रपूर जिल्ह्यातील झारपट नदीचे खोरे या भागांमध्ये आढळतात.

### दुसरा टप्पा - मध्यपुराणाश्मयुग

मध्यपुराणाश्मयुग काळात हवामानात बदल झाल्याने मानवाच्या राहणीमानातही बदल झाला. मुख्यत: हत्यारे तयार करण्याच्या तंत्रामध्ये बदल झाला. ओबडधोबड दगडाच्या चिपांपासून हत्यारे तयार केली जाऊ लागली. कुऱ्हाडीसारखी चिप ही डिंकासारख्या पदार्थाचा वापर करून हाडाच्या खाचेत घट्ट बसविली जाऊ लागली. मध्यपुराणाश्मयुग काळातील अवशेष नर्मदा खोरे, तुंगभद्रा खोरे व महाराष्ट्रातील गोदावरी, प्रवरा, घोडनदी, मुळा-मुठा, वैनगंगा व झारपट नद्यांच्या खोऱ्यांमध्ये मिळालेले आहेत. पुणे जिल्ह्यातील इनामगाव येथे अनेक हत्यारे व शिंपले मिळालेले आहेत.

### तिसरा टप्पा - उत्तरपुराणाश्मयुग

उत्तरपुराणाश्मयुगात मानव गुहेबरोबरच झोपड्या तयार करून राहू लागला. यावरून त्याला ऋतूचे ज्ञान अवगत झाले होते. यावेळी दगडांच्या चिपांशिवाय लहान लहान छन्न्या, बाणाची टोके, सुरे अशी हत्यारे वापरू लागला, शिवाय सांबरशिंगांची व हाडांची हत्यारेही वापरत होता. गारगोटीची छिलके तयार करून त्याचा वापर बाणासाठी करीत होता. चमडी शिवण्यासाठी हाडाच्या सुईची निर्मिती झाली. त्यामुळे चमडी शिवण्याची कला आत्मसात केली. आता शरीराभोवती असणाऱ्या पाला, साल यांची जागा चमड्याने घेतली. नैसर्गिकरीत्या नटण्याची आवड लोकांमध्ये निर्माण झाली होती. हस्तिदंत व हरणांच्या दातांचे मणी, शंखाचे मणी, बांगड्या,



Scanned with CamScanner

शिंपले, कवड्या असे दागिने वापरात येऊ लागले. चित्रकलेचीही लोकांना आवड होती. भीमबेटका गुहा, कैमूर गुहा (उत्तरप्रदेश) आणि पाटणे (महाराष्ट्र) येथील चित्रकलेहून उत्तरपुराणाश्मयुगकालीन चित्रकला विकसित झाली होती.

**२) मध्याश्मयुग –**

अश्मयुग व नवाश्मयुग यामधील काळ म्हणजे 'मध्याश्मयुग' होय. पश्चिम बंगाल, मध्यभारतातील छोटा नागपूर, कृष्णा नदी परिसर, महाराष्ट्रातील रत्नागिरी, रायगड येथे मध्याश्मयुगातील अवशेष मिळतात. या काळात दगडी चिपांऐवजी गारगोटीची हत्यारे तयार केली. ही हत्यारे छोटी असून त्रिकोण, समांतर बाजू असलेले छिलके, चंद्रकोर, समांतर द्विभुज चौकोन अशा भूमितीजन्य आकाराची आढळतात. या हत्यारांच्या वापराबाबत एक नवीन तंत्र होते. ते म्हणजे ही छोटी छोटी हत्यारे डिंकासारख्या पदार्थाने हाडांमध्ये घट्ट चिटकविलेली होती किंवा लाकडात ती बांधलेली होती. त्याचा भाल्यासारखा किंवा करवतीसारखा उपयोग करीत होते. मानवी वस्ती आता पूर्णतः स्थिरावू लागली होती, त्यामुळे मातीची भांडीही अधिक प्रमाणात होऊ लागली. गुजरात मधील लांघणज येथील उत्खननात अनेक गारगोटीची छोटी हत्यारे व मातीची भांडी मिळालेली आहेत.

**३) नवाश्मयुग –**

**कृषीजीवन –** 'नवाश्मयुग' ही अश्मयुगातील संस्कृतीची अंतिम अवस्था होय. या कालखंडात मानव पूर्णतः गुहेतून बाहेर आला. चौकोनी किंवा गोल आकाराच्या झोपड्यांमध्ये राहू लागला. मातीची घरेही तयार होऊ लागली. धान्य साठविण्यासाठी रांजणाचा वापर केला. आपल्या पाळीव प्राण्यांच्या संरक्षणासाठी गोठा बांधला. या काळात मानवाने शेती करण्याची कला पूर्णतः विकसित केली होती. पेरणी तंत्र आत्मसात केले. शेतीसाठी बैल, दुधासाठी गायी, शेळ्या, मेंढ्या पाळू लागला. त्यामुळे तो पशुपालकही झाला. बुर्झाहोम येथे पाळीव कुत्र्याचे त्याच्या मालकाबरोबर दफन केल्याचे अवशेष मिळालेले आहेत. शेतीच्या विकासामुळे अन्नधान्य मोठ्या प्रमाणात होत असल्याने मांसाहार कमी झाला.

**हत्यारे –** नवाश्मयुगीन काळात हत्यारे तयार करण्याचे तंत्र अधिक विकसित झाले होते. ते म्हणजे हत्यारे घासून-घासून चमकदार, गुळगुळीत व धारदार केली जात होती. या हत्यारात प्रामुख्याने कुऱ्हाडी, फरशा, छन्न्या, वाकस, हातोडी, बाण इत्यादी व नांगरण्यासाठी फाळ वापरला जात होता. शिकारीसाठी भाल्याची टोके आणि मासेमारीसाठी आवश्यक असणारा बाण अशी हाडांपासून बनविलेली हत्यारे



Scanned with CamScanner

बुर्झाहोम आणि चिराद येथे सापडली आहेत; तर लाकडी मूठ असलेला दगडी परशु हे हत्यार दक्षिण भारतात मिळालेले आहे. अहमदनगरमधील नेवासे येथे दगडाच्या घोटीव कुऱ्हाडी व रापी मिळालेल्या आहेत.

**भांडीकुंडी** – शेतीचा विकास झाल्याने मानव आता अन्न वाटून व शिजवून खाऊ लागला. अन्न वाटण्यासाठी दगडी पाटे-वरवंटे वापरत. अन्न शिजविण्यासाठी मातीची भांडी वापरू लागला.

**वस्त्र व अलंकार** – कोळ्यांच्या जाळी विणण्याच्या पद्धतीवरून विणकाम पुढे आले. सुती, लोकरीचे कापड तयार होऊ लागले. नवाश्मयुग जसजसे अधिक विकसित झाले तसतशी लोकांची आवडनिवडही अधिक वाढली. विविध मण्यांपासून अलंकार तयार करत. यामध्ये शंख, माती, दगड, गारगोटी, हस्तिदंत इत्यादींचा समावेश होता.

**धर्मकल्पना** – शेती अधिक विकसित झाल्याने नैसर्गिक देवदेवतांची पूजा केली जाऊ लागली. मातृदेवतेला अधिक महत्त्व होते.

**दगडी स्मारके** – दफन केल्यानंतर तेथे दगडी स्मारके उभारत होते. अशी स्मारके प्रामुख्याने आंध्र प्रदेशच्या पूर्वेकडील भाग व तामिळनाडूमध्ये आहेत.

**कला** – नवाश्मयुगात कुंभार कला विकसित झाली. अन्न शिजविण्यासाठी, खाण्यासाठी व साठविण्यासाठी मातीच्या भांड्यांचा वापरत करत. पूर्वी हाताने मातीची भांडी तयार करत पण पुढे मात्र चाकाद्वारे भांडी तयार होऊ लागली. काही भांड्यांवर तर ती भाजण्यापूर्वी रंगकाम व चित्रकाम केले जात होते.

## ४) ताम्रपाषाणयुग –

नवाश्मयुगाच्या नंतरचा स्थित्यंतरचा टप्पा हा ताम्रपाषाण संस्कृतीचा आहे. या कालखंडात मानव गुळगुळीत दगड व तांबे धातूतील हत्यारे वापरत असल्याने या युगाला 'ताम्रपाषाण युग' असे म्हणतात. भारतात ताम्रपाषाण संस्कृतीचे अवशेष पुढील ठिकाणी मिळालेले आहे. उत्तरप्रदेशातील अजंत्रीखेडा, मध्यप्रदेशातील कायथा व एरण, बिहारमधील चिरांद, राजस्थानातील अहार, महाराष्ट्रातील सावळदा, प्रकाशे, जोर्वे, नेवासा, दायमाबाद, चांदोली आणि इनामगाव इत्यादी. या सर्व ठिकाणी मिळालेल्या वस्तूंवरून ताम्रपाषाण संस्कृती ही पूर्ण ग्रामीण स्वरूपाची असल्याचे दिसून येते. लोकांचा मुख्य व्यवसाय शेती होता. त्याला निगडित असणारे पशुपालनही केले जात होते. ताम्रपाषाण काळातील शेतकरी गहू, तांदूळ, बाजरी, विविध प्रकारच्या डाळी पिकवत होते. दख्खनमध्ये कापूस घेतला जात होता. मानवाच्या



Scanned with CamScanner

भटक्या व शिकारी जीवनाची समाप्ती होऊन स्थिर जीवनाची झालेली सुरुवात ही ताम्रपाषाणयुगाचे मुख्य वैशिष्ट्य होते.

**घरे** – ताम्रपाषाणयुगीन लोक पूर्णतः वसाहत करून राहू लागले. गवत व बांबूंनी शाकारलेली मातीची घरे होती, ती गोलाकार स्वरूपाची होती. घरांभोवती नाही पण वसाहतीभोवती तटबंदी व खंदक निर्माण केले होते. शत्रू, हिंस्र पशुंपासून संरक्षण व्हावे हा उद्देश असला पाहिजे, तटबंदी व खंदक असल्याचे अवशेष इनामगाव व कायथा येथे मिळालेले आहे तर जोर्वे, नेवासे, चांदोली, नाशिक, सोनगाव, इनामगाव व दायमाबाद इत्यादी ठिकाणी मातीच्या थरावर थर असणारी तटबंदी मिळाली आहे. नदीच्या किनारी वसाहती असल्याने पाण्याची कमतरता नव्हती. पूर्वीच्या काळात शिकारीसाठी अनेक जण एकत्रित येत पण ताम्रपाषाणयुगात मात्र शेतीच्यादृष्टीने एकत्रित येऊ लागल्याने कुटुंब व्यवस्थेचे स्वरूप प्राप्त होऊ लागले हेदेखील ताम्रपाषाण संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे.

**भांडी** – ताम्रपाषाण संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणजे या काळात काळ्या व तांबड्या रंगातील मातीची भांडी अनेक ठिकाणी मिळालेली आहेत. दायमाबादला येथे लोकांनी हाताने बनवलेली खापरे राखी रंगाची व जाड होती. याशिवाय वाडगी, कटोरे, कंगोरा (सरळ तोटीचे किटलीसारखे असून त्याला धरण्यास मात्र हात नसतो) अशा मातीच्या भांड्यांवर रंगीत चित्रही काढत होते. माठ व रांजणावरही काळ्या रंगात चित्रे काढलेली आहेत. दायमाबाद येथे सापडलेल्या माठावर एक मानवी आकृती आपल्याकडे मोर व हरणे आकृष्ट होत असतानाचे चित्र आहे; तर येथे सापडलेल्या रांजणावर मानवाचे चित्र व वाघाचे चित्र आहे. नेवासे येथे मिळालेल्या खापरावर पळणाऱ्या काळवीटाचे चित्र, दुसऱ्या खापरावर कुत्र्याचे चित्र, तर तिसऱ्या खापरावर हरणांची चित्रे आहेत. याशिवाय, अनेक भांड्यांवर तारा, बाण, लहान नागमोडी रेघ, फुली हेदेखील आहे. यावरून मानव-प्राणी-निसर्ग यांचे संबंध गुंफलेले असल्याचे संकेत वरील सर्व खापरांवरील चित्रांवरून दिसून येत आहे.

**हत्यारे** – नवाश्मयुगाप्रमाणेच ताम्रपाषाणयुगातही गारगोटीची लहान लहान हत्यारे तयार करून त्याला चंद्रकोर, त्रिकोण, चाकूसारखा आकार देऊन ही पाती लाकडाच्या किंवा हाडाच्या खोबणीत बसवित होते. तांबे धातूची कुऱ्हाड वापरीत होते. अशा कुऱ्हाडी, छन्न्या, दाभणे ही जोर्वे, नेवासे व चांडोली येथे सापडली आहेत. चांडोली येथे सापडलेली कट्यार ही वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**अलंकार** – प्रगत अशा ताम्रपाषाणयुगात लोकांना अलंकारांची आवड



Scanned with CamScanner

होती. दायमाबाद, जोर्वे व बहाळ येथे मातीच्या माळा, तांब्याच्या धातूतील माळ, वाळे, कडी असे अलंकार सापडले आहेत.

**मृतांना पुरण्याची पद्धत –** ताम्रपाषाणयुगात मृतांना राहत्या घरातच पुरण्याची पद्धत होती. साधारणत: बालकांना मडक्यात तर प्रौढ पुरुष, स्त्रियांना तीन–चार मीटरचा खड्डा खोदून पुरत होते. मृताशेजारी त्याच्या वापराची भांडी, अलंकार ठेवत होते. नेवासे व चांदोली येथे मृताच्या गळ्यात तांब्याची माळ दिसून आली आहे. नेवासे येथे मृताच्या गळ्यात रेशमी दोऱ्यात ओवलेली तांब्याची माळ सापडलेली आहे. दायमाबाद, नेवासे येथे पुरलेल्या प्रौढाचा सांगाडा मिळालेला आहे. काही ठिकाणी घराच्या बाहेरही बालक, प्रौढांना पुरल्याचे अवशेष सापडलेले आहेत. थोडक्यात, ताम्रपाषाणयुगात मृतदेह जाळत नसून पुरण्यात येत होते.

**ताम्रपाषाण संस्कृतीची वैशिष्ट्ये –**


ताम्रपाषाणयुगीन अर्थव्यवस्था ग्रामीण स्वरूपाची होती. तांब्याच्या कुऱ्हाडीमुळे जंगल तोडून शेती करण्यास गती आली. गोल आकारातील बांबूची शाकारलेली मातीची घरे वैशिष्ट्यपूर्ण होती. दख्खनच्या काळ्या मातीत कापसाचे उत्पादन होत असल्याने कापडनिर्मितीचे तंत्र विकसित झाले. ताम्रपाषाणयुगात जरी तांबे धातूचा वापर झाला असला तरी भांडी मात्र मातीचीच होती; त्यामुळे कुंभाराचा व्यवसाय अधिक गतिशील झाला. खापरावर मिळालेली चित्रकलाही मानव व निसर्ग यांच्यातील संबंधाबद्दल महत्त्वपूर्ण होती. मातृदेवतेच्या पूजेला महत्त्व दिले. मृतांना पुरत असताना त्यांच्यासोबत असणाऱ्या वस्तुंवरून त्याचे समाजातील स्थान, प्रतिष्ठा समजून आली.

Scanned with CamScanner

Early India (From Prehistory to the Age of the Rashtrakutas)

# प्रारंभिक भारत

## प्रागैतिहासिक काळ ते राष्ट्रकुट काळ



934
001-034618
Acc.No.SR-34618

डॉ. जगदीश सोनवणे • डॉ. बाळासाहेब केंदळे
• डॉ. दिनकर मुरकुटे • डॉ. अतुल ओहाळ

Prashant

Scanned with CamScanner

Early India (From Prehistory to the Age of the Rashtrakutas)

# प्रारंभिक भारत

## प्रागैतिहासिक काळ ते राष्ट्रकुट काळ

934
001-034640
Acc.No.SR-34640







Prashant

डॉ. जी. बी. शहा ▪ डॉ. एस. डी. खैरनार
प्रा. नारायण शिंदे

Scanned with CamScanner